## - ऋण निर्देश -

या शोधनिबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांनी मला सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आवश्यक आहे. सर्वप्रथम माझे मार्गदर्शक व शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रपाठक डॉ. ए.एस्. चौसाळकर यांनी मला जे बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के.के. कावळेकर यांनीही मला वेळोवेळी मार्गदर्शन करून शोध निबंध पूर्ण करण्यास सहकार्य केले. तसेच राज्यशास्त्र विभागातील इतर प्राध्यापक डॉ. गोपाळ गुरु, प्रा.वासंती रासम यांचेही मार्गदर्शन मला मिळाले. मी त्यांची आभारी आहे.

हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी विद्यापीठातील बॅ.खर्डेकर ग्रंथालयाची खूप मदत झाली. तसेच कराडचे यशवंतराव चव्हाण वाचनालय, श्रीरामपूरचे लो.टिळक वाचनालय आणि आर्.बी.एन्.बी. कॉलेज, श्रीरामपूर यासर्व वाचनालयांतून मला अनेक पुस्तके उपलब्ध झाली. त्याबद्दल मी या सर्व ग्रंथालयांच्या ग्रंथपालांची आभारी आहे.

तसेच महिला महाविद्यालय कराड या माझ्या कॉलेजचे प्राचार्य, ग्रंथपाल यांचीही मी आभार मानते. हा शोधनिबंध मी लवकर पूर्ण करावा यासाठी मला माझ्या सहकारी प्राध्यापिका कु. जयंती आर्. भाटवडेकर व माझी मैत्रिण कु. विद्या ह. कुलकर्णी यांनी अत्यंत आपुलकीने सर्व प्रकारची मदत केली. मी त्यांची आभारी आहे.

या शोध निबंधाचे काम पूर्ण करून देणारे टंकलेखक श्री विष्णुपंत खाडे यांचीही मी आभारी आहे. तसेच या शोधनिबंधाच्या कार्यात ज्यांची मला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत झाली त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानते. धन्यवाद !

दिनांक:
कोल्हापूर